# स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धा नियम

**स्पर्धेचा उद्देश :**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी तसेच शालेय शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यातील सर्जनशीलता आणि काव्यलेखन कलेस प्रोत्साहन देणे.

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्रता, नियम व अटी :**

१) स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी तसेच शालेय शिक्षण विभाग सक्षमीकरण व प्रशासन शाखेत कार्यरत अधिकारी, कर्मचारी स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

२) विषय निवडीचे स्वातंत्र्य स्पर्धकाला असेल. कविता कोणत्याही प्रकारची (प्रेरणादायी, विनोदी, शैक्षणिक सामाजिक) असू शकेल, परंतु ती मूळ स्वरचित असावी.

३) कविता राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारी नसावी. कवितेत अश्लील, विघातक किंवा कोणत्याही प्रकारचे वादग्रस्त विषय तसेच शब्द नसावेत.

४) कविता सादरीकरणासाठी योग्य असावी.स्वरचित कविता केवळ मराठी भाषेतीलच असावी.

५) कवितेसाठी ओळींची मर्यादा कमाल १० ते १२ काव्यपंक्ती व शब्दमर्यादा कमाल ५० ते ७० शब्द असावी.

६) प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धेपूर्वी कवितेची लिखित प्रत संयोजकांकडे सादर करावी.

७) स्पर्धकाला कार्यालयाचे अधिकृत ओळखपत्र बंधनकारक असेल.

८) सदर स्पर्धेचे मूल्यांकन प्रत्येक स्तरावरील गठीत परीक्षण समिती मार्फत करण्यात येईल. स्पर्धेत सहभागी असलेल्या व्यक्तीला परीक्षण समितीमध्ये घेण्यात येऊ नये .परीक्षण समितीतील परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

९) एका स्पर्धकाला केवळ एकच कविता सादर करता येईल.

१०) स्पर्धांचे निकष नियमावली सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका  या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे सदर पुस्तिका www.maa.ac.in या संकेतस्थळावर 'उपयुक्त' या टॅब वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

११) स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धा खालील प्रमाणे ३ स्तरावर आयोजित करण्यात येईल

१) तालुकास्तर स्पर्धा माहे नोव्हेंबर (तिसरा शनिवार)

२) विभागस्तर स्पर्धा डिसेंबर (तिसरा शनिवार )

३) राज्यस्तर स्पर्धा जानेवारी (तिसरा शनिवार )

१२) सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्म द्वारे संकलित केले जाईल हा गुगल फॉर्म एस सी ई आर टी पुणे यांचे मार्फत पत्राद्वारे कळविण्यात येईल .जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत केंद्रप्रमुखांपर्यंत हा गुगल फॉर्म पाठवण्यात येईल.  केंद्रप्रमुख यांचे मार्फत  सर्व स्पर्धकांची माहिती गुगल फॉर्म मध्ये नोंदविण्यात यावी.

१३) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे ठिकाण ज्या तालुक्यात/ब्लॉकमध्ये आहे, त्याच तालुक्यामध्ये त्यांची नोंदणी होईल. ते थेट तालुका स्तरावर स्पर्धा करतील, त्यांच्यासाठी केंद्र स्तरावरील निवड प्रक्रिया होणार नाही. त्यांची नोंदणी शिक्षकांपासून पूर्णपणे स्वतंत्र असेल, परंतु स्पर्धा समान असेल आणि ते त्या तालुक्यामधील शिक्षकांसोबतच स्पर्धा करतील. अधिकारी फक्त एका स्पर्धेतच नोंदणी करू शकतील. कोणत्याही स्पर्धेत पुढील स्तरासाठी अधिकाऱ्यांची स्वतंत्र निवड केली जाणार नाही.

१४) प्रत्येक केंद्रातून किमान एक शिक्षक या स्पर्धेला सहभागी होईल या दृष्टीने प्रत्येक केंद्रप्रमुखाने स्वतः शिक्षकांकडून माहिती घेऊन ही लिंक भरावी

१५)  तालुकास्तरावर प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावर स्पर्धेसाठी पात्र राहील .

१६)  विभाग स्तरावर प्रथम  **५** क्रमांकाचे विजेते राज्यस्तरावर सहभागासाठी पात्र राहतील .

१७)  **राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर** यांचे मार्फत करण्यात येईल. त्याबाबतचे नियोजन स्वतंत्र रीत्या पत्रादवारे कळविण्यात येईल.

१८) स्वरचित कविता माझी स्वतःची रचना असून कवितेच्या मूळ अधिकाराबद्दल काही प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबत मी स्वतः जबाबदार असेल असे संमतीपत्रक प्रत्येक स्पर्धकाला सादर करावे लागेल.

**स्वरचित काव्य स्पर्धा परीक्षणाचे निकष पुढीलप्रमाणे**

| अ. क्र. | निकष | निकषाधारित मुद्दे | गुण |
|---|---|---|---|
| १ | **कवितेचा आशय** | १) कवितेचा विषय स्पष्ट आणि प्रभावी आहे का?<br>२) विषयामध्ये सुसंगतता आणि नावीन्य आहे का? | २० |
| २ | **भाषेचे सौंदर्य आणि काव्यशैली** | १) भाषा समृद्ध, प्रभावी आणि प्रवाही आहे का?<br>२) नादमयता, रचनेतील गेयता, लय व अलंकारांचा योग्य वापर आहे का ?<br>३) शब्दांची निवड आशयाला पूरक आहे का? | २० |
| ३ | **सादरीकरण कौशल्य** | १) आवाजातील स्पष्टता, चढउतार व भावनांचा योग्य समन्वय आहे का ?<br>२) सादरीकरणा मध्ये आत्मविश्वास व श्रोत्यांशी संवाद आहे का?<br>३) शरीराची हालचाल (देहबोली) व अभिव्यक्ती प्रभावी आहे का? | २० |
| ४ | **भावगर्भता आणि प्रभाव** | १) कवीने भावनांची गुंफण प्रभावीपणे केली आहे का?<br>२) कवितेचा  श्रोत्यांच्या मनावर दीर्घकालीन प्रभाव पडतो का? | २० |
| ५ | **तात्पर्य व सामाजिक संदेश** | १) कवितेचा अर्थ स्पष्ट आणि विचारप्रवर्तक आहे का?<br>२) काव्याचे तात्पर्य सामाजिक जाणिवांना प्रोत्साहन देते का?<br>३) श्रोत्यांना कवितेचा संदेश अंतर्मुख करतो का ? | २० |
|  | एकूण गुण |  | १०० |